# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

### विद्यापीठ स्तरावर घेतलेल्या परीक्षांतर्गत छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मधील उन्हाळी सत्र परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. सदर परीक्षांमधील सोबत जोडलेल्या अभ्यासक्रमांचे निकाल रविवार दिनांक ०६ जुलै, २०२५ रोजी विद्यापीठाच्या **https://onlineresults.unipune.ac.in/Result/Dashboard/Default** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आलेले आहेत.

सोबत जोडलेल्या परीक्षेतील निकालप्राप्त सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येत आहे की आपण ११ जुलै ते २० जुलै या कालावधीत जर आपणास आपल्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत हवी असेल तर, सशुल्क अर्ज करावेत. दि. २१ जुलै २०२५ नंतर विद्यार्थ्यांना छायांकित प्रत उपलब्ध होईल. छायांकित प्रत उपलब्ध होताच या विद्यार्थ्यांना जर त्यांना गुणपडताळणीत / शंका एखादा प्रश्न तपासला नसेल, असे आढळल्यास त्यांनी गुणपडताळणीसाठी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत उपलब्ध होताच पाच दिवसात विनाशुल्क अर्ज करावेत. परंतु ज्या विद्यार्थ्यांना आपल्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करायचे आहे त्यांनी छायांकित प्रत मिळाल्यावर पुनर्मूल्यांकनासाठी सशुल्क अर्ज करावेत.

त्यानंतर गुणपडताळणीचा काही भाग तपासायचा राहून गेला असल्यास त्याची खातरजमा, किंवा पुनर्मूल्यांकन झाल्यानंतर अनुरूप गुणप्रदर्शन विद्यार्थ्यांच्या ग्रेडशिटमध्ये प्रदर्शित होईल. तसेच गुणबदलाची पुन्हा खात्री करायची असेल तर विद्यार्थ्यांस विहित मुदतीतच पुन्हा ऑनलाईन सशुल्क अर्ज करावा लागेल, त्यानंतर प्रत्यक्ष गुणबदलाची छायांकित उत्तरपत्रिका विद्यार्थ्यास त्यांच्या प्रोफाईलमध्ये प्रदर्शित होईल. हे परिपत्रक संबंधित सर्व घटकांस तात्काळ ध्यानात आणून द्यावे.

( प्रा. डॉ. प्रभाकर देसाई )
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा. क्र. परीक्षा छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकन कक्ष/३४१ दिनांक : ०७ जुलै, २०२५.

| Sr. No. | Name of Examination & Pattern |
|---|---|
| 1 | M.E. (2017 PATTERN) |